नियमित दिवाणी दावा क्र. १५४/२०१५
पांडुरंग –वि– जगन्नाथ
निशाणी क्र. ४६ लगत

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एम. एस. देशपांडे यांच्याकडून**

०३. मी इयत्ता दहावी पास आहे. माझ्या वडिलांना किसन असा एक भाऊ आहे. मला एकुण चार वडिलोपार्जित मिळकती आहेत. मला सदर मिळकतींचे क्रमांक सांगणे शक्य नाही. सदर मिळकतींपैकी तीन मिळकतींची विक्री करण्यात आलेली आहे. त्यापैकी विक्री घेणा–यांची नावे कैलास धोत्रे, शाहुबा रयाजी व रामदास पिसे अशी आहेत. कैलास धोत्रे याच्या नावावर असलेल्या जागेच्या पुर्वेस कृष्णा पिसे, पश्चिमेस देवराव बालाजी, दक्षिणेस गोविंदा आनंदा व उत्तरेस रस्ता आहे. शाहुबा रयाची याच्या मिळकतीच्या पुर्वेस व उत्तरेस रस्ता, दक्षिणेस चावडी व पश्चिमेस ज्ञानेश्वर धोत्रे यांची मिळकत आहे. रामदास पिसे याच्या मिळकतीच्या पुर्वेस रस्ता, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस प्रतिवादी क्र.१ व उत्तरेस रस्ता आहे.

०४. दावा मिळकत ग्रामपंचायत घर क्र.७ चे दोन पोटहिस्से आहेत. सदर दोन्ही पोटहिश्यांचे क्षेत्रफळ मी सांगु शकणार नाही. साक्षीदार सांगतो की, मी दावा मिळकतीचे क्षेत्र सांगु शकेन. हे मला सांगता येणार नाही की, ग्रामपंचायत गावातील मिळकतींची दर दोन वर्षांनी फेर आकारणी करते अगर कसे? दावा मिळकतीचा माझ्या म्हणण्याप्रमाणे ग्रामपंचायत मिळकत क्र.७ आहे. सदर मिळकतीचा पुर्वी काय क्रमांक होता याची मला माहिती नाही.

०५. हे मला माहित नाही की, खरेदी–विक्रीचा व्यवहार नोंदणीकृत करणे आवश्यक असते अथवा कसे? आम्ही नोंदणीकृत दस्तऐवज अस्तीत्वात आणलेला नाही. प्रतिवादी क्र.१ हे माझे चुलत भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जालना येथील वरिष्ठ न्यायालयामध्ये प्रतिवादी क्र.१ विरुद्ध दावा क्र.६२७/२०२२ व ५१९/२०२२ असे दोन दावे प्रलंबित आहेत. तसेच भोकरदन येथील न्यायालयामध्ये प्रतिवादी क्र.१ विरुद्ध दावा क्र.१०१/२०२० व ५६/२०२१ असे दोन दावे प्रलंबित आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ विरुद्ध मी महसुल दफ्तरी देखील कार्यवाही चालु केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, भोकरदन न्यायालयामध्ये माझेविरुद्ध कौटुंबिक प्रकरण क्र.१०२/२००६ प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ व आमचे बोलणे चालणे बंद आहे.

०६.		हे म्हणणे खरे नाही की, वादीस दावा मिळकतीची विक्री करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ व माझे वडीलांचे वाटप झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

(मयुरेश आर. काळे)

दिनांकः ०९.०९.२०२५

दिवाणी न्यायाधीश क. स्तर

भोकरदन